


# दैनिक आपला विदर्भ



apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 83 ■ मंगळवार, दि. 29 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


## अमित ठाकरेंना वाटते 'या' गोष्टीची धाकधूक

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईच्या ३६ विधानसभा मतदारसंघांपैकी माहीम व वरळी या मतदारसंघांची विशेष चर्चा पाहायला मिळत आहे. या मतदारसंघांमध्ये ठाकरे घराण्याची तिसरी पिढी अर्थात अनुक्रमे राज ठाकरेंचे पुत्र अमित ठाकरे व उद्धव ठाकरेंचे पुत्र आदित्य ठाकरे राजकीय वर्तुळात एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. त्यामुळे त्यांची उमेदवारी व त्यांच्यासमोर उभ्या असलेल्या शिवसेनेच्या उमेदवारांचीही चर्चा सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर आज माहीम विधानसभा निवडणुकीचा अर्ज भरण्यापूर्वी अमित ठाकरेंनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी आदित्य ठाकरेंवर टीका करतानाच अमित ठाकरेंनी इतरही मुद्द्यांवर दिलखुलासपणे उत्तरं दिली.

## सत्ता आल्यास मी उपमुख्यमंत्री होणार, मुश्रीफांचा दावा



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा जोरदार प्रचार चालू आहे. या विधानसभा निवडणुकीत प्रामुख्याने महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा संघर्ष पाहायला मिळत आहे. दोन्ही बाजूचे पक्ष निवडणुकीला सामोरे जात असले तरी महायुती किंवा मविआने आपला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर केलेला नाही. महायुतीने म्हटलं आहे की ''आम्ही आमचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढत आहोत''. तर, मविआ नेत्यांनी म्हटलं आहे की ''निवडणूक जिंकल्यानंतर आम्ही आमचा मुख्यमंत्रिपदासाठीचा नेता ठरवू. मविआमध्ये काँग्रेस व शिवसेना (ठाकरे) हे पक्ष मुख्यमंत्रिपदासाठी मोर्चेबांधणी करत आहेत. तर, महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पार्टीचे कार्यकर्ते अजित पवारांना मुख्यमंत्री केलं जावं यासाठी प्रचार करत आहेत. दुसऱ्या बाजूला, भाजपा व शिवसेनेने (शिंदे) सध्या मुख्यमंत्रिपदाबाबत मौन बाळगलं आहे.

दरम्यान, अजित पवारांचा पक्ष दोन-दोन उपमुख्यमंत्रिपदं मिळावी यासाठी प्रयत्न करत असल्याची चर्चा रंगू लागली आहे. या पक्षातील वरिष्ठ नेते हसन मुश्रीफांच्या एका वक्तव्यामुळे या चर्चांनी जोर धरला आहे.




# बारामतीत कोण जिंकणार? काका की पुतण्या; शरद पवारांनी स्पष्टच सांगितले

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/ प्रतिनिधी :** राज्याचे नव्हे तर देशाचे लक्ष लागलेल्या बारामती विधानसभा मतदारसंघात आज एकीकडे अजित पवार यांनी शक्तिप्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केलाय, तर दुसरीकडे युगेंद्र पवार यांनी शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केलाय. लोकसभेत बारामतीच्या जनतेने सुप्रिया सुळे यांना भरभरून मतदान केलंय, तेच मतदान विधानसभा निवडणुकीत युगेंद्र पवारांना होताना पाहायला मिळेल का? असं शरद पवार यांना विचारलं असता ते म्हणाले की, माझा बारामतीच्या जनतेवर पूर्ण विश्वास आहे. राज्याच्या राजकारणात मला शक्ती देण्याचं काम बारामतीमधील जनतेने केलंय आणि त्याची सुरुवात १९६५ पासून झाली असून, ती आजपर्यंत सुरूच आहे. माझा आतादेखील बारामतीच्या जनतेवर पूर्ण विश्वास असून, या निवडणुकीतदेखील बारामतीकर महाविकास आघाडीचे उमेदवार युगेंद्र पवार यांना प्रचंड मतांनी विजयी करतील, असं यावेळी शरद पवार म्हणालेत.



बारामती विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार युगेंद्र पवार यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केलाय, यावेळी त्यांच्यासोबत पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, वडील श्रीनिवास पवार आणि आई शर्मिला पवार आदी मान्यवर उपस्थित होते, यावेळी त्यांना याबाबत विचारले असता, त्यांनी आपलं मत व्यक्त केलंय. पवार म्हणाले की, आज बारामती विधानसभा मतदारसंघातून तरुण उमेदवार युगेंद्र पवार याचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आलोय. युगेंद्र पवार यांचं शिक्षण परदेशात झालंय. एक उच्चशिक्षित, पदवीधर आणि प्रशासनाचा जाणकार असलेला हा उमेदवार आहे. मला खात्री आहे की बारामतीची जनता ही नव्या पिढीतील नव्या नेतृत्वाचा स्वीकार करतील आणि आपली शक्ती उभी करतील, असं यावेळी शरद पवार म्हणालेत.

महाराष्ट्रातील सगळ्याच विधानसभेचा आढावा घेत आहोत. लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्राच्या जनतेने महाविकास आघाडीला प्रचंड प्रतिसाद दिलाय. जवळपास ४८ जागांपैकी ३१ जागा महाविकास आघाडीने जिंकल्यात. यासाठी राज्यातील जनतेचा मी आभारी आहे. मी त्यांना आश्वासन देतो की, तुम्ही जी कामगिरी केलीय, त्याची नोंद आम्ही आमच्या अंत:करणात कायम ठेवलीय. आता राज्यातील विधानसभा निवडणुकीला सुरुवात झालीय. महाविकास आघाडीच्या माध्यमातून आम्ही सर्व जागा लढत आहोत. महाविकास आघाडीत ९० ते ९५ टक्के जागांवर एकमत झालंय. काही थोड्या जागांवर विचारविनिमय सुरू आहे. एक ते दोन दिवसात तेही पूर्ण होईल, आम्हाला महाराष्ट्रात सत्ता परिवर्तन करायचंय. कारण ज्यांच्याकडे आज राज्याची सत्ता आहे, त्यांच्याकडून जनतेचे प्रश्न हे सोडवले गेले नाहीत, असंही शरद पवारांनी अधोरेखित केलंय.

युगेंद्रला काय कानमंत्र देणार असं विचारलं असता पवार म्हणाले की, ५७ वर्षांपूर्वी मी बारामतीच्या तहसील कार्यालयात स्वत:चा फॉर्म भरण्यासाठी आलो होतो आणि त्या दिवसापासून आजपर्यंत सातत्याने जनतेने मला निवडून दिलंय. याच कारण जनतेशी असलेली बांधिलकी आणि विनम्रता, तसेच जनतेचे प्रश्न सोडविण्यावर भर हेच मी नव्या पिढीला सांगणार असल्याचं यावेळी पवार म्हणालेत. महाविकास आघाडीकडून अजूनही काही जागांवर तिढा सुटलेला नाही, याबाबत पवार यांना विचारलं असता ते म्हणाले की, याबाबत चर्चा सुरू असून, काही ठिकाणी दोन उमेदवार दिले असले तरी सध्या अर्ज भरून ठेवा, असं सांगण्यात आलंय. यातून देखील मार्ग काढण्यात येणार आहे. महाविकास आघाडीमध्ये बहुतांश जागांवर चर्चा झाली असून, काही जागांवर चर्चा सुरू आहे. तसेच लवकरच त्यांच्या देखील प्रश्न मिटणार आहे, असंही शरद पवारांनी सांगितलं.

महायुतीकडून या विधानसभा निवडणुकीत लाडकी बहीण योजनेला पुढे केलं जातंय, याबाबत पवार यांना विचारलं असता ते म्हणाले की, निवडणुकीत उभा राहणारा प्रत्येक जण हे सांगत असतो की, मी निवडून येणार आहे. तर हे सांगत नाही की, मी निवडून येणार नाही. ज्या काही सुविधा सरकारने या पाच महिन्यांत दिल्यात त्या पाहिल्या तर साडेचार वर्ष त्यांच्या हातात सत्ता होती, तेव्हा कधी यांना बहिणींची आठवण झाली नाही. लोकसभेच्या निवडणुकीनंतर यांना आता लाडक्या बहीण लाडके भाऊ हे सर्व आठवत आहे, असा टोला यावेळी शरद पवार यांनी लगावलाय.

## अमित ठाकरेंविरोधात निवडणूक लढण्यास सदा सरवणकर ठाम

**मुंबई/प्रतिनिधी :** माहिम विधानसभा मतदारसंघातून यंदा तिहेरी लढत पाहायला मिळणार आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे सदा सरवणकर, मनसेचे अमित ठाकरे अन् शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे महेश सावंत निवडणुकीच्या रिंगणात आहे. दरम्यान, लोकसभेला राज ठाकरेंनी भाजपाला बिनशर्त पाठिंबा दिला होता. त्यामुळे राज्यातील काही मतदारसंघात भाजपा आणि मनसेत मैत्रीपूर्ण लढत होण्याची शक्यता वर्तवली जातेय. त्यामुळे माहिममधून सदा सरवणकर यांचा अर्ज मागे घेण्याची मागणी जोर धरू लागली. परंतु, सदा सरवणकर निवडणूक लढवण्यावर ठाम आहेत.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने यंदा पहिल्यांदाच अमित ठाकरे यांना उमेदवारी दिली असून माहिममधून ते निवडणूक लढवणार आहेत. त्यामुळे त्यांना पाठिंबा द्यावा अशी मागणी केली जातेय. परिणामी सदा सरणवकर यांना उमेदवारी मागे घेण्यासाठी दबाव वाढला होता. येत्या २४ तासांत त्यांनी उमेदवारी मागे घ्यावी, असं म्हटलं गेलं होतं. परंतु, त्यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग साईटवरून उद्या म्हणजेच २९ ऑक्टोबर रोजी अर्ज भरायला जाणार असल्याचं जाहीर केलं आहे.

## मी केलेली चूक त्यांनी करायला नको होती; अजित पवारांचे बारामतीत शरद पवारांबाबत मोठे विधान

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर घडामोडींना वेग आला आहे. विधानसभेसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान पार पडणार आहे, तर या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी उद्या २९ ऑक्टोबर रोजी शेवटचा दिवस असल्यामुळे आज राज्यातील अनेक दिग्गज नेते आपले उमेदवारी अर्ज दाखल करत आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील बारामतीतून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी अजित पवार यांनी बारामतीत मोठं शक्तीप्रदर्शन केलं. दुसरीकडे अजित पवार यांचे पुतणे युगेंद्र पवार यांनी देखील आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. युगेंद्र पवार यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी स्वत: शरद पवार उपस्थित होते.



लोकसभेच्या निवडणुकीनंतर बारामतीत पुन्हा एकदा पवार विरूद्ध पवार असा सामना पाहायला मिळणार आहे. लोकसभेच्या निवडणुकीत बारामतीत शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्यात लढत झाली होती. त्यानंतर आता काका आणि पुतण्यात लढत होणार आहे. यासंदर्भातच बोलताना आज अजित पवारांनी बारामतीत एक मोठं विधान केलं. 'लोकसभेला सुप्रिया सुळे यांच्या विरोधात सुनेत्रा पवार यांना उभं करून मी चूक केली. पण आता युगेंद्र पवार यांना माझ्या विरोधात उभं करून तीच चूक त्यांनी (शरद पवार यांनी) करायला नको होती', असं अजित पवारांनी म्हटलं आहे.

## महाविकास आघाडीत बिघाडी; सतीश चव्हाण यांच्या अडचणी वाढणार ? महाविकास आघाडीतील नेत्यांचा उमेदवारीला विरोध

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी :** गंगापूर विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं आमदार सतीश चव्हाण यांना शनिवारी उमेदवारी जाहीर केली. त्यानंतर स्वपक्षातील पदाधिकाऱ्यांबरोबरच मित्र पक्षातील पदाधिकाऱ्यांनीही सतीश चव्हाण यांच्या उमेदवारीला विरोध केला आहे. निष्ठेनं पक्षाचं काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर हा अन्याय करण्यात आला आहे, असा आरोप कार्यकर्त्यांनी केला आहे. त्याबाबत त्यांनी एका संयुक्तीक पत्राद्वारे खुलासा केला.

सतीश चव्हाण यांच्या उमेदवारीला विरोध : ''गंगापूर-खुलताबाद विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचा उमेदवार दिनांक शनिवारी जयंत पाटील यांनी जाहीर केला आहे. महाविकास आघाडीच्या उमेदवारीबाबत महाविकास आघाडीच्या सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी १४ ऑगस्टला पत्रकार परिषद घेऊन स्थानिकांना डावलून आयात उमेदवारांना उमेदवारी देऊ नये, अशी मागणी केली होती. याबाबत महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी शरद पवार यांना प्रत्यक्ष भेटुन निवेदन दिलं. यावेळी त्यांनी सतिश चव्हाण यांचा आपल्या महाविकास आघाडीशी कोणताही संबंध नाही. त्यांना उमेदवारी देण्यात येणार नाही, असं सांगितलं होतं. त्यानंतर प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, विनायक राऊत, बाळासाहेब थोरात, मिलींद नार्वेकर यांच्या भेटी घेऊन निष्ठावंतांना उमेदवारी द्यावी अशी मागणी केली होती. याप्रसंगी या सर्व नेत्यांनी तुम्हाला विश्वासात घेऊनच निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले होते. परंतु दुर्दैवाने तसे घडले नाही,'' असे महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या या पत्रात नमूद करण्यात आले आहे.



जागा भाजपाकडे गेल्याने नाईलाजाने झाला : महाविकास आघाडीकडून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर सतीश चव्हाण यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी मी अजित पवार यांच्यासोबत विकास निधी आणि इतर कामासाठी गेलो होतो. तसेच महायुतीत ही जागा भाजपाकडं गेल्यामुळे मला नाईलाजास्तव शरदचंद्र पवार पक्षामार्फत महाविकास आघाडीची उमेदवारी घ्यावी लागली. त्यामुळे आम्ही यापूर्वी ठरवल्याप्रमाणे मनोज जरांगे यांनी सांगितल्याप्रमाणं सर्व इच्छुक उमेदवार संयुक्तरित्या उमेदवारी अर्ज भरणार आहोत.

## नांदेड दक्षिण व लोहाच्या निवडणूक निरीक्षक श्रीमती पल्लवी आकृती यांचे आगमन

**नांदेड/ प्रतिनिधी :** नांदेड दक्षिण व लोहा विधानसभा मतदारसंघासाठी श्रीमती पल्लवी आकृती (भा.प्र.से.) यांची निवडणूक निरीक्षक (सामान्य) जनरल ऑब्झर्वर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांची ही नियुक्ती नांदेड दक्षिण व लोहा या दोन विधानसभा मतदारसंघासाठी असून त्यांचा संपर्क क्रमांक ८२३७९६०९५५ असा आहे.सदरील निरीक्षकांशी मतदारांनी काही अडचण अथवा शंका असल्यास त्यांच्या भ्रमणध्वनी क्रमांकावर व्हाट्सएपच्याद्वारे संपर्क करु शकतात, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी ८७-नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघ तथा उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोपरी पाचपाखडीतून दाखल केला उमेदवारी अर्ज

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांनी आज कोपरी-पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे कुटुंबीय आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, खासदार नरेश म्हस्के, आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रवींद्र फाटक मुख्यमंत्र्यांचे वडील वडील संभाजी शिंदे, पत्नी सौ. लता शिंदे, सून सौ. वृषाली शिंदे, नातू रुद्रांश तसेच हेदेखील उपस्थित होते.



शिवसेनेचं शक्तिप्रदर्शन : एकनाथ शिंदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर ठाण्यात शिवसेनेचं शक्तिप्रदर्शन पाहायला मिळालं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठिंबा देण्यासाठी शिवसेनेचे अनेक नेते आणि कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

एकनाथ शिंदे यांच्याविरोधात केदार दिघे : कोपरी-पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघातून एकनाथ शिंदे यांच्याविरोधात ठाकरेंच्या शिवसेनेचे केदार दिघे हे निवडणूक लढवीत आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मंगळवारी शेवटची तारीख आहे. विधानसभेच्या निवडणुका २० नोव्हेंबरला होणार असून, २३ नोव्हेंबरला सर्व २८८ मतदारसंघांसाठी मतमोजणी होणार आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला १०५ जागा, शिवसेनेला ५६ आणि काँग्रेसला ४४ जागा मिळाल्या होत्या. २०१४ मध्ये भाजपाला १२२, शिवसेनेला ६३ आणि काँग्रेसला ४२ जागा मिळाल्या होत्या.

अजित पवार यांनी यांनीही दाखल केला उमेदवारी अर्ज : राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी आज बारामती विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. अजित पवार यांचे पुतणे आणि शरद पवार यांचे नातू युगेंद्र पवार हेही बारामती मतदारसंघातून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहेत. त्यामुळं बारामतीत यंदा अजित पवार विरुद्ध युगेंद्र पवार असा काका-पुतण्यातील सामना पाहायला मिळणार आहे.

## गोवंश रक्षणाचा संकल्प...

गोवत्स द्वादशी किंवा वसुबारस हा धनत्रयोदशीच्या एक दिवस आधी साजरा केला जाणारा उत्सव आहे. या दिवशी गाय आणि तिच्या वासराची पूजा केली जाते. खेड्यापाड्यांमध्ये गायींच्या शरीरावर विविध प्रकारांचे रंगाचे शिक्के मारून तसेच त्यांच्या शिंगांना मोरपीस बांधून त्यांना सजविले जाते व त्यांची पूजा केली जाते. आपली संस्कृती ही कृषिप्रधान संस्कृती आहे. गाय या संस्कृतीचा प्रमुख आधार आहे. प्राचीन काळापासून जी शेती होत होती त्यामध्ये शेत वखरणे, नांगरणे व इतर सर्वच कामांकरिता बैलांची गरज भासायची. गायीचे गोन्हे हे पुढे बैल म्हणून शेतीला उपयोगी ठरायचे. त्याचप्रमाणे गायीपासून बैलांची प्राप्ती व्हायची. भविष्यात दूध देणाऱ्या गायीसुद्धा गायीपासूनच प्राप्त व्हायच्या. त्यामुळे गायीचे अनन्यसाधारण महत्त्व होते आणि आहे. केवळ शेतीसाठी बैल प्राप्त होतात म्हणून गायीचे महत्त्व आहे, असे नाही तर धार्मिकदृष्ट्या गायीच्या संपूर्ण शरीरामध्ये देवतांचा वास आहे, अशा पद्धतीची धार्मिक मान्यता आहे. त्यामुळे गाय ही पवित्र आहे. नंदिनी, सुशीला या गायींचा पौराणिक काळामध्ये उल्लेख येतो. रामायणामध्ये एका ठिकाणी दशरथ राजाला पुत्रवियोगाचे दुःख का प्राप्त झाले. याबद्दल उल्लेख आहे की, ज्यावेळेस एक गाय रस्ता पार करीत होती त्यावेळेस दशरथ राजा आपला रथ घेऊन चालला होता. त्याने आपला रथ हळू करून गायीला जाऊ दिले नाही तर स्वतः पहिले निघून गेला. या त्याच्या कृत्यामुळे त्याला पुत्रवियोगाचे दुःख प्राप्त झाले. पांडव जेव्हा अज्ञातवासात होते तेव्हा पांडवांना बाहेर काढण्यासाठी कौरवांनी विराट राजाच्या गायी पळविल्या होत्या. गाय म्हणजे प्रत्येकाची प्रतिष्ठा होती. गायींना पळविल्यानंतर पांडव अज्ञातवास सोडून बाहेर येतील व आपल्याशी युद्ध करतील, हा कौरवांना विश्र्वास होता. गायीला 'गोधन' असे म्हटलेले आहे. गायीपासून पंचगव्याची म्हणजे दही, दूध, तूप–लोणी, गोमूत्र शेण या सर्वांची प्राप्ती होते. त्यामुळे गाईचे अनन्यसाधारण स्थान आहे. गाय हा दयाळू प्राणी आहे. गायीचे दूध हे अर्भकांनासुद्धा चालते. ज्या बालकांची आई त्यांना दूध देऊ शकत नाही अशा बालकांचे पोषण गायीच्या दुधावर होऊ शकते; इतके गायीचे महत्त्व आहे. श्रीकृष्णाच्या कपिला गायीचा उल्लेख महाभारतामध्ये आलेला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार हे पुसद येथे गेले असता त्यांना असे दिसले की, एक कसाई गायीला मारण्यासाठी घेऊन जात आहे. त्यांनी कसायाला थांबवले. तू या गायीला मारू नको. तुला जी काही किंमत पाहिजे, ती मी देतो, असे म्हणून त्यांनी कसायाला गायीचे मोल विचारले. तरीही तो कसाई गाय द्यायला तयार होत नव्हता. त्यांनी गायीचे अधिकचे पैसे देऊ केले. कसाई म्हणाला की, मला गायीचे पैसे नको, मला हिचे मांस हवे आहे. मी हिला मारणारच! तेव्हा डॉ. हेडगेवारांनी आपले रौद्ररूप धारण केले व त्याच्याकडून गाय हिसकावून घेतली. गोंदवलेकर महाराजांनी अनेक वेळा गायींचे रक्षण केले होते. एकदा ते बाजारामध्ये गेले असता त्यांना एक कसाई गायींना घेऊन चाललेला दिसला. त्यांनी त्या कसायाला गायीचे अधिक मूल्य देऊ केले तरी तो कसाई गाय देईना. शेवटी महाराजांनी त्याला आणखीन मूल्य दिले व त्याच्याकडून ती गाय विकत घेतली. महाराज त्या गायीला म्हणाले की, बाई, तुझ्यावर आज खूप कठीण प्रसंग आला होता. परंतु रामाच्या कृपेने तू वाचली आहेस. शेगावचे संत गजानन महाराज यांच्याकडे काही लोकांनी उनाड गायीला साखळदंडाने बांधून आणले. महाराज म्हणाले की, 'अरे, ही गाय अवघ्या जगाची माय आहे. हिला अशा यातना देणे बरे नव्हे.' त्यानंतर त्या उनाड गायीला महाराजांनी शांत होण्यास सांगितले. ती गाय मरेपर्यंत महाराजांच्या जवळच राहिली. यावरून आपल्याला संतांची गायीबद्दलची प्रीती, गोभक्ती लक्षात येते. योगी आदित्यनाथ हे सुद्धा गोभक्त आहेत. बजरंग दल आणि विश्र्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते कुठलाही मानसन्मान, सामाजिक स्तुती किंवा राजकीय स्तुती याची अपेक्षा न करता गोवंश संरक्षणाचे कार्य आपल्या जिवाची बाजी लावून करत असतात. ठिकठिकाणी जो गोवंश कत्तलीसाठी जात असतो, त्याला पकडून गायींची गोशाळेमध्ये रवानगी करण्याचे काम विश्र्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाचे कार्यकर्ते नेहमीच करीत असतात. आताच महाराष्ट्र सरकारने गायीला 'राजमाता' अशा पद्धतीचा दर्जा दिलेला आहे. या आधीच्या फडणवीस सरकारने महाराष्ट्रामध्ये गोहत्या बंदीचा कायदा केला. त्या आधीच्या सरकारने गायींची कत्तलच करण्याची परवानगी दिली होती. त्यामुळे येणाऱ्या काळात गोवंश रक्षकांचे सरकार आपल्याला आणायचे आहे. गायीला राजमाता दर्जा देणाऱ्यांचे सरकार आणायचे आहे की कसायांचे सरकार आणायचे आहे, याचा विचार सर्वसामान्य जनतेने केला पाहिजे. एखादा कसाई जर सूटबूट घालून उभा असेल व एखादा गोभक्त अगदी धोतर घालून उभा असेल, दोघांच्याही हातामध्ये हिरवा चारा असेल तर गायीला कसायाच्या अंगाचा वास घेऊनसुद्धा तिला समजू शकते की, हा आपला प्राणहर्ता आहे अन् धोतर घातलेल्या गरीब शेतकऱ्याकडे बघूनसुद्धा तिला समजू शकते की, हाच आपला रक्षक आहे. असा हा दैवी प्राणी आहे. या गोवंशाचे रक्षण झाले पाहिजे, ही तुमची आमची सर्वांची जबाबदारी आहे.. पूर्वी ६८ पेक्षा अधिक देशी वंशाच्या गायी होत्या; आता त्यांची संख्या ३८ पेक्षा कमी झाली आहे. भारतीय वंशाच्या गायी समाप्त होऊ नये, त्यांचे अत्यंत पौष्टिक आणि अमृततुल्य दूध आपल्या देशातील बालकांना मिळावे यासाठी देशी वंशाच्या गायींचे संरक्षण होणे आवश्यक आहे. गोवत्स बारस हा दिवस गाईंचे पूजन करण्याचा दिवस आहे. या दिवशी आपण गोवंशाचे संरक्षण करण्याचा व त्यांचे संवर्धन करण्याचा संकल्प करूया. हीच त्यांची खरी पूजा ठरेल.

# मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी नवनवीन संकल्पना राबवा –निवडणूक निरीक्षक

### निरीक्षक स्मिता सबरवाल, नरेश झा, सिमा सरकार बुलढाण्यात दाखल; निवडणूक तयारीचा घेतला आढावा

**दैनिक आपला विदर्भ**





**बुलढाणा/प्रतिनिधी** : यंदाच्या विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी नवनवीन संकल्पना राबवावी व मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी समाजमाध्यमांचा वापर करावा, अशा सूचना बुलढाण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या निवडणूक निरीक्षक (सामान्य) यांनी दिल्या आहेत.

जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रियेवर देखरेख करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी स्मिता सबरवाल, नरेश झा, सिमा सरकार यांची नियुक्ती केली आहे. हे निरीक्षक बुलढाण्यात दाखल झाले असून त्या सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणूक तयारीचा आढावा घेतला.

या आढावा बैठकीला जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील, अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोणेवार, निवासी उपजिल्हाधिकारी अजिंक्य घोडगे, उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात, समाधान गायकवाड, जयश्री ठाकरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे यांचेसह सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते.

भारत निवडणूक आयोगाने मतदान जनजागृतीसाठी स्वीप कार्यक्रम सुरु केला आहे. या कार्यक्रमांतर्गत मतदारांमध्ये मतदानाविषयी जागृती करावी. बुलढाण्यात मतदानाची टक्केवारी वाढली पाहिजे. त्यासाठी सामाजिक उत्तरदायित्वातून खासगी संस्थांच्या सहभागाने मतदारांसाठी योजना सुरु करण्याची संकल्पना राबवावी. मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी समाजमाध्यमांचा वापर करावा. मतदानाबाबत जाणीव जागृती करावी. निवडणूक काळात दारु, अवैध रोकड वाटपाविरोधात गांभीर्याने कारवाई करावी त्यात गती आणावी. तपासणी नाक्यावरील अधिकारी व कर्माचाऱ्यांनी कडक तपासणी करावी. मतदान केंद्रांवर सोयीसुविधा, कायदा व सुव्यवस्थेचे नियोजन करावे, अशा सूचना निवडणूक निरीक्षक स्मिता सबरवाल यांनी केल्या.

निवडणूक निरीक्षकांनी यावेळी निवडणुकीच्या अनुषंगाने प्रशासनाच्या तयारीची माहिती घेतली. यामध्ये मतदारसंघांची विभागणी, उमेदवारी अर्ज, लोकसंख्या, सीमाभाग, मतदार संख्या, मतदार नोंदणी प्रक्रिया, गृहमतदान, सेवा मतदार, मतदान केंद्र, वाढीव, वगळलेले व स्थलांतरित मतदार, स्वीप कार्यक्रम, वेबकास्टींग, प, ईव्हीएम व व्हीव्हीपॅटची सरमिसळ, वितरण, मनुष्यबळ, प्रशिक्षण, कंट्रोल रुम, मतमोजणी केंद्र, माध्यम कक्ष, वाहतूक व्यवस्था, स्थिर सर्वेक्षण पथक, पोलीस मनुष्यबळ, वैद्यकीय सुविधा, दारु व रोकड जप्ती, फ्रिबीज, कायदा व सुव्यवस्था आदी बाबींची आढावा निरीक्षकांनी घेतला.

**निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज, प्रक्रियेचे होतेय वेबकास्टिंग – जिल्हाधिकारी**

यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती दिली. विविध माध्यमातून मतदार जनजागृती केली जात आहे. प्रचार प्रसिद्धी केली जात आहे. उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. या निवडणूक प्रक्रियेचे वेबकास्टिंग केले जात आहे. उमेदवारी अर्ज प्रक्रिया संपल्यानंतर निवडणूक प्रक्रियेला गती येईल. प्रशासन सज्ज झाले आहे. सातही मतदारसंघांच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना नियोजनाच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

बैठकीच्या अंतिम टप्प्यात निवडणूक निरीक्षकांनी प्रशासनाच्या नियोजनाचे कौतूक करुन पुढील तयारीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# ऍरोबिक व्यायाम सर्वात उपयुक्त


वजन कमी करण्यासाठी आणि शरीरातल्या फ्ॅटस्चे ज्वलन करण्यासाठी नेमका कोणता व्यायाम करावा याबाबत नेहमीच चर्चा चालते आणि चर्चेत सहभागी होणारे लोक आपापल्या परिने आपली मते व्यक्त करीत असतात. परंतु अमेरिकेतील नॉर्थ कॅरोलीना येथील काही संशोधकांनी वजन कमी करण्यासाठी ऍरोबिक व्यायाम सर्वाधिक उत्तम असल्याचे दाखवून दिले आहे. त्यांनी या बाबत प्रत्यक्ष पाहणीच्या आधारे काही निष्कर्ष काढले आहेत त्यासाठी बैठी कामे करणार्‍या २३४ स्त्री–पुरुषांच्या शरीरातील बदल न्याहाळले आहेत.



१८ ते ७० वर्ष या वयोगटातील या लोकांची नोंद घेतली आणि त्यांना ८ महिन्याचा ऍरोबिक अभ्यासक्रम पूर्ण करावयास लावले. त्यामध्ये ऍरोबिक ट्रेनिंग, रेझिस्टन्स ट्रेनिंग या दोन प्रकारच्या व्यायामांचा समावेश होता. या दोन्ही व्यायामांचे वेगवेगळे परिणाम नोंदण्यात आले तेव्हा असे आढळले. ऍरोबिक व्यायाम करणार्‍यांच्या हृदयाचे ठोके चांगले पडतात. हा व्यायाम आठवड्यातून तीन दिवस प्रत्येक दिवशी ४५ मिनिटे केला तरी चालते. त्यामुळे वजन कमी होते. अशाच प्रकारच्या अन्य व्यायाम प्रकारांनी स्नायूंना चांगला व्यायाम होतो, भूक चांगली लागते. परंतु वजन उतरण्याच्याबाबतीत त्यांचा फ्ारसा उपयोग होत नाही. यातल्या २३४ लोकांच्या तीन महिन्यांच्या अभ्यासक्रमा नंतरच्या वजनांची तुलना करण्यात आली. तेव्हा ऍरोबिक व्यायाम करणार्‍यांनी बरेच वजन गमावल्याचे आढळले.

त्या व्यतिरिक्त बॉडी मास इंडेक्स, कमरेचा घेर, हृदयाची अवस्था अशा अनेक चाचण्या घेण्यात आल्या तेव्हा असे दिसून आले की या सगळ्या निकषांवरसुध्दा ऍरोबिक व्यायाम करणार्‍यांनी अन्य व्यायाम करणार्‍यापेक्षा जास्त प्रगती केलेली आहे. वैशिष्ट्य म्हणजे ऍरोबिक व्यायाम रोज केलाच पाहिजे असे या तज्ञांचे म्हणणे नाही. परंतु आठवड्यातून किमान तीनदा तरी तो करावा असा त्यांचा सल्ला आहे. केवळ ऍरोबिकच नव्हे तर इतरही अनेक व्यायामांच्या बाबतीत असाच सल्ला असतो. व्यायाम रोजच केला पाहिजे असा नियम नाही. आठवड्यातून किमान तीन किंवा चार दिवस करावा असा डॉक्टरांचा नेहमीच सल्ला असतो.

# अकाली केस पांढरे होणे – कारणं आपल्या आहारविहारातच !



आजकाल केस लवकर पांढरे होण्याची समस्या खूप मोठ्या प्रमाणात वाढली आहे. अगदी लहान मुलांमधेसुद्धा केस पांढरा डोकावयाला लागला आहे. अकाली पांढर्या केसांना काळे करण्याकरीता मोठे कॉस्मेटिक उत्पादनाचं दालनच आपल्याला बघायला मिळते. तरुण मुलं मुली पांढरे केस काळे करण्याकरीता या रसायनयुक्त उत्पादनांचा सर्रास उपयोग करतांना दिसतात. कलर डाय विविध पॅक याकरीता उपलब्ध आहेत. मूळापासून केस पुन्हा काळे होतील याची शाश्र्वती मात्र कुणीच देत नाही. केसांचे आरोग्य चांगल राहीलच याची देखील शक्यता नसते. आयुर्वेद मात्र व्याधी कोणताही असो त्याची कारणं शोधून त्या कारणांचा त्याग व त्या कारणानुसार चिकित्सा यावर भर देतो.

अकाली केस पांढरे कशामुळे होऊ शकतात ?

आहारात मीठाचे प्रमाण जास्त असणे – मीठ (सहसा सैंधवच) आहारात कमी प्रमाणातच असावे. पापड लोणचं, वरून अधिक मीठ घेण्याची सवय याव्दारे जास्तीचे मीठ खाल्लुया जाते. जे केसांना अकाली पांढरे करतात. अतिचिंता, काळजी, क्रोध – या मानसिक आवेगांमुळे शरीरातील दोष साम्यता बिघडून पित्त वाढून केस पांढरे होतात. पित्त वाढविणार्या रसांचे, आहाराचे सतत सेवन – आंबट, तिखट आणि लवण हे तीन रस पित्तवर्धन करणारे असतात त्यामुळे हे अधिक प्रमाणात घेणे पित्त वाढवून केसांचे आरोग्य बिघडवितात व केस पांढरे होतात. उन्हात जास्त वेळ उघड्या डोक्याने काम करणे.

आहारात तूप दूध अशा स्निग्ध पदार्थांचा समावेश नसणे – केस हा अस्थिधातूचा उपधातु आहे त्यामुळे याचे शरीरात योग्य पोषण होण्याकरीता आहारात तूप दूध अश्या स्निग्ध द्रव्यांचा समावेश आवश्यक आहे. शरीराला आतून बाहेरून स्निग्ध ठेवल्याने कोणताच अवयव रुक्ष होत नाही वात वृद्धी होत नाही. धातूचे पोषण आहारानेच होऊ शकते. धातुचे पोषण जेवढे चांगले त्याचे कार्य चांगले होत राहील. केसांना जर पोषणच मिळाले नाही तर केस गळणे पिकणे हे हमखास बघायला मिळेल. केसांना तेल लावणे हा देखील केसांच्या मूळांना बळकट स्वस्थ करण्याकरीता आवश्यक आहे.

अनुवांशिक इतिहास – हे देखील कारण अकाली केस पिकण्याचे असू शकते. याशिवाय आजकाल हेअर कलरचा उपयोग, जड पाणी, केसांवर विविध प्रयोग, डोक्याची केसांची उष्णता वाढविणारे यंत्र ( कर्लिंग, ड्रायर इ.) गरम पाणी डोक्यावरून घेणे; ही सुद्धा कारणे आढळतात. आपण बर्याचदा म्हणतो ' डोकं थंड ठेव' डोकं शांत असणे, पित्त न वाढणे केसांच्या आरोग्याकरीता आवश्यक. म्हणूनच केस का पांढरे होतायत हे शोधणे व त्याचा त्याग करणे ही चिकित्सेची सुरवात गरजेची ठरते.

## उपयुक्त गुडवेल

आयुर्वेदिक शास्त्रानुसार गुडवेलची पाने ही सर्व आजारांवर उपयुक्त असतात. गुडवेलच्या पानांत कॅल्शिअम प्रोटिन फॉस्फरस आढळते. रोगप्रतिकारकशक्ती वाढवण्यासाठी गुडवेल एक उत्तम औषध आहे.१.ताप कमी करण्याचा गुडवेलमध्ये अद्भुत गुण आहे.२.गहू अथवा ज्वारीच्या रसासोबत तसेच तुळशीच्या पानांच्या रसासोबत किंवा कडुलिंबाच्या पानांसोबत गुडवेल सेवन केल्याने कर्करोगासारखे आजार बरे होतात.३.टायफॉईड, मलेरिया डेंग्यू, उलटी, चक्कर येणे, खोकला, कावीळ, अँलर्जी आदी रोगांवर गुडवेल औषधी आहे.

कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्यासाठी गुडवेल फायदेशीर ठरते.अशा प्रकारे तुम्ही खूप सार्या आजारांवर हे गुडवेल वापरू शकता म्हणून आयुर्वेदिक शास्त्रात यालाही जास्त महत्त्व प्राप्त झाले आहे.

## औषधी मेंदी

आता सणावाराच्या दिवसात नटण्या–सजण्याबरोबर मेंदीचा वापर आवर्जून करण्याकडे स्त्रियांचा कल असतो. सौंदर्यसाधनेमध्ये मेंदीचा मोठ्य़ा प्रमाणावर वापर केला जातो. मेंदीच्या पानातील रंगद्रव्यामुळे तसेच फुलातून मिळणार्या सुगंधी द्रव्यांमुळे मेंदीला व्यापारी महत्त्वही आहे. मेंदीमध्ये अनेक औषधी गुणतत्त्व आहेत. मेंदीच्या खोडाच्या सालीच्या अर्कामुळे त्वचारोग, पांढरे कोड आदी विकार दूर होतात. मेंदीच्या सालीच्या काढय़ाने मुतखडा दूर करता येतो. मेंदीच्या पानांचा लेप गळवे, जखमा, खरचटणे, भाजणे किंवा त्वचेचा दाह इत्यादींवर बाह्य उपचार म्हणून उपयुक्त ठरतो. मेंदीच्या पानांमध्ये वांतिकारक आणि कफोत्सारक गुणधर्म आहे. घसादुखी असल्यास गुळण्या करताना पाण्यात मेंदीची पाने घातली जातात. पायांची आग शमवण्यासाठी, शरीरातली अतिरिक्त ऊर्जा उत्सर्जित करण्यासाठी, डोकेदुखी थांबवण्यासाठी मेंदी डोक्याला किंवा पायाला लावतात. मेंदीच्या पानांचा, सालींचा अर्क क्षयविकार दूर करण्यासाठी उपयोगात येतो. मेंदीच्या फुलातून टीरोझसारखे सुगंधी द्रव्य प्राप्त होते. यालाच हीना किंवा मेंदीतेल म्हणतात.

## गुणकारी अंजीर

अंजीर शक्तिवर्धक असून पचनास जड पण शीतदायी आहे. सुक्या अंजिरामधील लोहामुळे आपले शरीर आणि जठर क्रियाशील बनते, परिणामत: भूक लागते. अंजीर पित्तविकार, वायुविकार आणि रक्तविकार दूर करते. अंजिराच्या रोजच्या सेवनाने मलावरोध नाहीसा होतो. अंजीर सकाळ–संध्याकाळ दुधात गरम करून खाल्ल्याने कफाचे प्रमाण कमी होते तसेच दम्याचा विकार नाहीसा होतो. शरीरातील उष्णता कमी करण्यासाठी आणि रक्तशुद्धीसाठीही अंजीर उपयोगी पडते. घरामध्ये लहान बालकाने चुकून काचेचा तुकडा गिळला तर तत्काळ अंजिरे खाऊ घालावी. या उपायाने काचेचा तुकडा गुदद्वारावाटे बाहेर पडतो. अंजीर हृदयरोगावरही गुणकारी आहे. बहुगुणी अंजीर उपयुक्त आहे तसेच ते पचनास जडही आहे. त्यामुळे अंजीर जास्त प्रमाणात खाल्लुयास पोटात दुखणे सुरू होते. म्हणून अंजीर खाताना योग्य प्रमाण लक्षात घ्यावे. जास्त पिकलेले अंजीर खाणे आरोग्यासाठी बाधक ठरते.

## गुणकारी काजू

काजूचे खूप लाभकारी आहे . थोडेसे काजू खाल्लुयास शरीराला केवळ ऊर्जाच मिळत नाही तर विविध आजारसुद्धा दूर होतात.१.काजूमध्ये जास्त प्रमाणात प्रोटीन असतात.२.काजू पचण्यास हलके असतात.३.काजूमध्ये आयर्न जास्त प्रमाणात असते, त्यामुळे ज्या लोकांच्या शरीरात रक्ताची कमतरता आहे त्यांनी नियमित काजू खावे.४.काजू पाण्यात भिजवून बारीक करून मसाज केल्यास त्वचा उजळते.५.काजू तेलकट असून त्वचेसाठी लाभकारी आहे.६.जर तुमची त्वचा तेलकट असेल तर काजू रात्रभर दुधामध्ये भिजवून ठेवा. सकाळी काजू बारीक करून त्यामध्ये मुलतानी माती, लिंबू किंवा दही मिसळून चेहर्यावर लावल्यास चेहरा उजळतो.७.काजू दररोज खाल्लुयास हाडे मजबूत होतात.८.काजूमध्ये अँटीऑक्सिडंट असल्याने शरीराचे वजन संतुलित ठेवले जाते.९.काही काम न करता थकवा जाणवत असल्यास काजू खावे. त्यामुळे तुमचा थकवा दूर राहतो, मूड चांगला राहतो. शरीरात शक्ती राहते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

**हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित**

# महाविकास आघाडीच्या विराट रॅलीने मेहकर दणाणले!

## सिद्धार्थ खरात यांचा उमदेवारी अर्ज दाखल





दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** :महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी प्रचंड जनसमुदायाच्या रॅलीने शक्तीप्रदर्शन करत आज दि. २८ ऑक्टोबर रोजी मेहकर विधासनसभा मतदार संघासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. महाविकास आघाडीचे उमेदवर खरात यांनी शक्तीप्रदर्शन करीत शहरातून काढलेल्या विराट रॅलीने संपूर्ण शहर दणाणून गेले होते. या रॅलीचे येथील स्वातंत्र्य मैदानावर सभेत रूपांतर झाले. त्यापूर्वी महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी कॉंग्रेसचे राज्य सरचिटणीस श्यााम उमाळकर, जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवत, उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे, रा.कॉं.नेते अॅड्.साहेबराव सरदार, कॉंग्रेसचे अॅड्.अनंतराव वानखेडे, शहर प्रमुख किशोर गारोळे, निसार अन्सारी,दिलीप वाघ,रा.कॉं.तालुका अध्यक्ष दत्ता घनवट, कलीम खान, दिलीप वाघ, ऍड आकाश घोडे या पदाधिकार्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला.या सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा संपर्क प्रमुख प्रा.नरेंद्र खेडेकर हे होते. तर माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांची प्रमुख उपस्थिती होती. तर सभेला महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची हजारोंच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

तसेच यावेळी माजी मंत्री सुबोध सावजी, कॉंग्रेसचे राज्य सरचिटणीस श्याम उमाळकर, माजी नगराध्यक्ष कासम गवळी, शिवसेना जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवत,रा.कॉं.नेते अॅड्.साहेबराव सरदार, कॉंग्रेसचे विधानसभा नेते अॅड्.अनंतराव वानखेडे व विद्यार्थीनी पूजा तांगडे यांची सुद्धा भाषणे झाली. यावेळी सभा मंचावर शिवसेना विधानसभा संघटक किसन पाटील, सि.राजा येथील सह संपर्क प्रमुख छगन मेहेत्रे, माजी नगराध्यक्ष अशोक अडेलकर,माजी सभापती भास्करराव गारोळे, तालुका प्रमुख निंबाजी पांडव,रा.कॉं.तालुका प्रमुख दत्ता घनवट,माजी नगराध्यक्ष विलास चनखोरे,आफताब खान, कलीम खान,शैलेश बावस्कर,निसार अन्सारी, शिवसेना महिला आघाडी जिल्हा प्रमुख जिजा राठोड, संजीवनी वाघ, पौर्णिमा गवई, दिलीप वाघ, पुरूषोत्तम पडघान,शैलेश सावजी, दीपक मापारी, भुषण मापारी, संजय वडतकर,गजानन खरात, चिपडे, डी.जी.गायकवाड, युवा सेना तालुका अधिकारी आकाश घोडे, रमेश देशमुख, साहेबराव हिवाळे, एन.ए.बळी, संदीप गवई,ऋषी जगताप, संदीप गारोळे सह शिवसेना, कॉंग्रेस व रा.कॉं.पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपजिल्हा प्रमुख प्रा.आशिष रहाटे यांनी केले. संचालन अजिम नवाज राही यांनी केले. तर आभार शहर प्रमुख किशोर गारोळे यांनी मानले.

### सिद्धार्थ खरात यांना विजयी करा,सर्व जबाबदारी मी घेतो : माजी मंत्री डॉ.शिंगणे

सिद्धार्थ खरात यांना विजयी करा,सर्व जबाबदारी मी घेतो,मेहकर वासियांना सिद्धार्थ खरात यांच्या माध्यमातून कोरा चेहरा दिला आहे. तुम्ही त्यांना विजयी करा पुढची सर्व जबाबदारी मी घेतो अशी ग्वाही माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी दिली.ते मेहकर विधानसभा मतदार संघाचे उच्चविद्याविभूषीत सिद्धार्थ खरात यांचा आज उमदेवारी अर्ज दाखल करण्यासाठी काढण्यात आलेल्या रॅलीचे सभेत रुपांतर झाल्यानंतर मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी ते पुढे म्हणाले की, मी दोन वर्षे महायुती सोबत होतो. जे ४० आमदार दादा सोबत गेले त्यापैकी मीच एकमेव होतो की मी फक्त जिल्हा बँकेच्या भल्यासाठी तिकडे गेलो होतो. मात्र एक दिवस सुद्धा सुखाने झोपलो नाही. शाहू, फुले, आंबेडकर यांचे विचार तिकडे नाहीत. मेहकरचा इतिहास तुम्हाला बदलायचा आहे. ही संधी आता हुकु देऊ नका. नाहीतर भविष्यात पश्चाताप होईल. महायुती सरकारने लाडकी बहीण योजना आणली. महिलांना दीड हजार रूपये मिळतात. आमचे सरकार आल्यावर ही योजना बंद तर होणार नाही उलट दीड हजार ऐवजी पाच हजार रुपये देऊ असे आश्र्वासन त्यांनी यावेळी दिले. उध्दव ठाकरेंच्या सरकारने २ लाख रुपयांपर्यतची कर्जमाफी दिली होती. आताही शेतकरी हवालदिल झाला आहे. कर्ज बाजारी झाला आहे. तेव्हा कर्जमाफी हवी असेल तर महाविकास आघाडीला मतदान करा, असे आवाहन सुद्धा त्यांनी केले.

### घराघरात मशाल पोहोचवा-प्रा.नरेंद्र खेडेकर

यावेळी मार्गदर्शन करताना शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख प्रा.नरेंद्र खेडेकर म्हणाले की, सहा महिन्यापूर्वी लोकसभेची निवडणूक झाली. आपलाच विजय होईल असे वाटत होते. मात्र यश आले नाही. विजय सोपा नसतो. शेवटपर्यंत लढाई लढावी लागते. येणाऱ्या काळात मतविभाजनाचा मोठा प्रयत्न होईल. धर्म निरपेक्ष विचारांची मते फुटता कामा नये याची काळजी घेणे आवश्यक आहे. घराघरात मशालच चिन्ह पोहोचवा. काही पुढारी सेटलमेंट करतील. त्यांच्या कडे लक्ष ठेवा. बाणावर मशालच उपाय आहे. जातीपातीच्या भानगडीत न पडता एकदिलाने मेहनत करा व मशाल विजयी करा असे आवाहन त्यांनी केले.

### मेहकर सोडणार नाही- सिद्धार्थ खरात

मेहकर विधानसभा मतदार संघाची उमेदवारी मला शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिली आहे. मी मंत्रालयात राहिलो तरी जनतेच्या प्रश्र्नांची जाण आहे. गावगाडयातला मी माणूस आहे. आतातर राजीनामा सुद्धा दिला आहे. मेहकर मतदार संघाचा नाविन्यपूर्ण विकास करण्यासाठी तुमचे आशीर्वाद मला हवे आहेत. इथे विकासाऐवजी दहशतवाद वाढत आहे. काही झाले तरी मी मेहकर सोडणार नाही, अशी ग्वाही सुद्धा त्यांनी दिली. यावेळी ते पुढे म्हणाले की, मी चळवळीतला माणूस आहे. प्रत्येक तरूणाच्या हाताला काम देणे हे माझे कर्तव्य राहील, असा विश्वास त्यांनी यावेळी मतदारांना दिला.

## संक्षिप्त...

### दादाला जर एवढं वाटत असेल तर त्यांनी मोठ्या मनाने युगेंद्रला संधी द्यावी श्रीनिवास पवार यांचे मत : बारामतीत पवार विरुद्ध पवार लढत

दैनिक आपला विदर्भ

**बारामती/प्रतिनिधी** : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व संपूर्ण देशाचे राजकीय लक्ष वेधणारे शरदचंद्र पवार यांचे होमपीच असलेल्या बारामतीत यावर्षी पहिल्यांदाच पवार विरुद्ध पवार अशी लढत होत आहे. दादाला अर्थात



अजित पवारला एवढं वाढत असेल तर त्यांनी मोठ्या मनाने युगेंद्रला संधी द्यावी, असे मत पवार कुटुंबातील व युगेंद्र पवार यांचे वडील श्रीनिवास पवार यांनी व्यक्त केले. श्रीनिवास पवार प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हणाले की, राजकारणातील या गोष्टीची सवय व्हायला लागली आहे. सुरुवातीला हा धक्का होता, परंतु आता त्याची सवय झाली आहे. ही काही कौटुंबिक लढाई नाही ही राजकीय लढाई आहे. त्यामुळे दोन्ही पक्ष आपापल्या पद्धतीने लढतील, यामध्ये एक जिंकणार आहे तर एक हरणार आहे. राजकारणात हारजीत होतच असते. दादाला अर्थात अजित पवारला जर एवढं वाटत असेल तर त्यांनी मोठ्या मनाने माघार घेऊन, युगेंद्रला संधी द्यावी.मोठे साहेब ३० वर्षे, दादा ३० वर्षे मग पुढच्या पिढीला ३० वर्षे द्या, असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला. पवार कुटुंबाच्या दिवाळीत काही फरक पडणार नाही.पवार कुटुंबातील चार-पाच राजकीय व्यक्ती सोडले तर, बाकी कुटुंबाला याबाबतीत काही देणे घेणे नाही. हे तिघे चौघे बिझी असतात. अजित पवार भावुक झालेली मी पाहिले नाही. केवळ घसा कोरडा पडला म्हणून ते पाणी प्यायले असतील.असेही युगेंद्र पवारचे वडील श्रीनिवास पवार यांनी मत व्यक्त केले.

### महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार शिरीषकोतवाल यांनी दाखल केला उमेदवारी अर्ज

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** :चांदवड देवळा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार तर कॉंग्रेस पक्षाचे व नाशिक जिल्ह्याचे कॉंग्रेस जिल्हा अध्यक्ष शिरीष कुमार कोतवाल यांनी आपला उमेदवारी अर्ज निर्णय अधिकारी तथा उपविभागी अधिकारी व तहसीलदार मंदार कुलकर्णी यांच्या कडे दाखल केला. यावेळी शिरीष कुमार कोतवाल यांनी आपल्या मतदारसंघात जे कामे अपूर्ण राहिले ते पूर्ण करण्याची ग्वाही दिली.



## अपक्ष उमेदवार सचिन आहेर यांनी केला उमेदवारी अर्ज दाखल



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : येवला लासलगाव मतदार संघामध्ये अपक्ष उमेदवार सचिन आहेर यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला असून अक्षरशः यावेळी कार्यकर्त्यांनी सचिन आहेर यांना आपल्या खांद्यावर घेत शक्ती प्रदर्शन करत येवला लासलगाव मतदार संघातून उमेदवारी अर्ज दाखल केला.या आगोदर महायुतीचे उमेदवार छगन भुजबळ, महाविकास आघाडीचे उमेदवार माणिकराव शिंदे तसेच आता सचिन आहेर यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्याने येवल्यात तिरंगी लढत बघण्यास मिळते की काय याकडे सर्वांचे लक्ष लागले.

### नांदेड दक्षिण मतदारसंघातील नागरिकांसाठी मतदान जनजागृती रांगोळी व चित्रकला स्पर्धा

**नांदेड/प्रतिनिधी** :आगामी लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा निवडणुकीत मतदारांची संख्या वाढावी यासाठी नांदेड जिल्हा प्रशासनाने जनजागृतीसाठी विशेष उपक्रम हाती घेतले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत राऊत आणि मुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्विपच्या प्रमुख मीनल करनवाल यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी वजीराबाद येथील मल्टीपर्पज हायस्कूलमध्ये नांदेड दक्षिण मतदार संघातील नागरिकांसाठी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत रांगोळी आणि चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

## निलेश राणेंनी उमेदवारी अर्ज केला दाखल

दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग प्रतिनिधी :** कोणताही गाजावाजा न करता कुडाळ-मालवण मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार माजी खासदार निलेश राणे यांनी आज (२८ ऑक्टोबर) आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी खासदार नारायण राणे, नितेश राणे, रवींद्र चव्हाण, दीपक केसरकर उपस्थित होते.

काय म्हणाले निलेश राणे?

: उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर महायुतीचे उमेदवार निलेश राणे यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, ''मी आज महायुतीकडून उमेदवारी अर्ज दाखल केलाय. आज कणकवली देवगड मतदारसंघाचे आमदार देखील अर्ज भरणार आहेत. आम्ही सर्व त्यांच्या रॅलीला जाणार असून तिकडे सभा होणार आहे. इकडं केवळ अर्ज भरला. बाकी शक्तिप्रदर्शन करण्याची आम्हाला गरज नाहीय. आम्ही सातत्यानं जनतेसोबत असतो आणि मला खात्री आहे की जनताही आम्हाला साथ देतील.'' तसंच मी एक साधा कार्यकर्ता असून सर्वसामान्यांचं काम करण्यासाठीच लढतोय, असंही निलेश राणे म्हणाले.

...त्यामुळं हाती घेतला 'धनुष्यबाण' : गेल्या काही वर्षापासून निलेश राणे यांनी कुडाळ-मालवण विधानसभा मतदारसंघात भाजपाची बांधणी केलीय. याचे सकारात्मक परिणाम नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकीत दिसून आले होते. कुडाळ मतदारसंघातून खासदार नारायण राणे यांना मोठं मताधिक्य मिळालं होतं. त्यामुळं हा मतदारसंघ भाजपाला मिळावा यासाठी पालकमंत्री रविंद्र चव्हाण आग्रही होते. परंतु, महायुतीच्या जागावाटपात हा मतदारसंघ शिवसेनेकडं गेल्यानं निलेश राणे यांना शिवसेनेत घेऊन धनुष्यबाणावर निवडणूकीत उतवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे बघायला मिळतेय.

## राष्ट्रवादी विरुद्ध भाजप असा होणार सामना

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी** : सोलापूर शहर उत्तर मधून माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख पाचव्यांदा रिंगणात सोलापूर. सोलापूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री भाजपचे विजयकुमार देशमुख यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन करत आज दि.२८ ऑक्टोबर रोजी महायुतीचे पदाधिकारी व हजारो कार्यकर्त्यांच्या



साक्षीने विधानसभा उमेदवारी अर्ज दाखल केला. विजयकुमार देशमुख हे मागील २० वर्षांपासून सोलापूर शहर उत्तर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत. विजयकुमार देशमुख यांनी यावेळी महायुतीकडून विधानसभा उमेदवारीचा अर्ज दाखल केला आहे. यावेळी महायुतीमधील भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नेत्यांची मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. सोलापूर शहर उत्तरमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे महेश कोठे विरुद्ध भाजपचे विजयकुमार देशमुख असा थेट सामना होणार आहे.

## प्रशांत डिक्कर यांनी बैल बंडीतुन जाऊन दाखल केला उमेदवारी अर्ज

दैनिक आपला विदर्भ

■ ओम उन्हाळे

**जळगाव** : परिवर्तन महाशक्तीचे उमेदवार प्रशांत डिक्कर यांनी आपल्या सहकाऱ्यांसह आज दि.२८ ऑक्टोबर रोजी एसडीओ कार्यालय येथे चक्क बैल बंडीतुन जाऊन नामांकन अर्ज दाखल केला. कोणाला गाडी पाठवली नाही. भाड्याला पैसे दिले नाही, कोणालाही खर्च न देता, स्वखर्चाने आलेल्या हजारो सहकाऱ्यांसह अर्ज दाखल करण्यात आला.अर्ज दाखल करताना डिपॉजीतची रक्कमही कार्यकर्त्यांनी ताबडतोब लोकवर्गणी जमा करून शासनाकडे सुपुर्द केली. प्रशांत डिक्कर यांची उमेदवारी दाखल झाल्याने विरोधक चांगलेच धास्तावले आहेत. विधानसभा निवडणुकीत परिवर्तन महाशक्तीचे उमेदवार प्रशांत डिक्कर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने या निवडणुकीत चांगलीच रंगत आली आहे. तर प्रशांत डिक्कर यांच्या उमेदवारीने विरोधकांचे गणित चुकविले




असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत असून विरोधकांचे आतापासूनच धाबे दणाणले असल्याची चर्चा राजकीय गोटात सुरू आहे. त्यामुळेच विरोधकांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांवर दबाव आणून अधिकाऱ्यांनी प्रशांत डिक्कर यांची जळगाव येथील आजची सभा नाकारली. तर, भाजपाचे उमेदवार संजय कुटे यांच्या पायाखालची वाळू सरकली असल्याचे बोलले जात आहे. तर भाजपच्या उमेदवारांना सभेसाठी रोजंदारीने माणसं आणावे लागले असल्याची चर्चा होत आहे. तर चार टर्मपासून सत्तेत असतानाही मतदार संघातील शेतकरी, शेतमजुरांमध्ये प्रचंड नाराजी असल्याचे दिसून येत असून प्रशांत डिक्कर यांनी आज दि.२८ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने विरोधकांनी धसकी घेतली असल्याचे बोलजे जात आहे. प्रशांत डिक्कर हे सर्वसामान्य कुटुंबातील असून त्यांची आर्थिक परिस्थिती जेमतेम असली तरी त्यांचा शेतकरी शेतमजूरांसाठी १६ वर्षांपासून केलेला संघर्ष प्रशांत डिक्करांसाठी लाभदायक ठरेल अशी एकंदरीत मतदारांमधे चर्चा ऐकायला मिळत आहे. छत्रपती संभाजी राजे, माजी खा. राजु शेट्टी, माजी मंत्री बच्चू कडू यांनी परिवर्तन महाशक्ती आघाडीकडून दिलेली उमेदवारी ही प्रशांत डिक्कर यांना यांच्यासाठी लाभदायक ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

# चिखलीकरांच्या आशीर्वादाने रेकॉर्ड ब्रेक मतांनी विजयी होणार

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास! हजारो समर्थकांच्या साक्षीने उमेदवारी अर्ज केला दाखल

दैनिक आपला विदर्भ

**चिखली/प्रतिनिधी :** काँग्रेस व त्यांच्या मित्रपक्षाप्रमाणे आम्हाला सत्ता प्रिय नसून संपूर्ण समाजाचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय आहे. त्यासाठी कार्य करण्याचा निर्धार महायुतीने केला आहे. या ध्येयाशी प्रामाणिक व कटिबद्ध असलेल्या आणि परिवर्तन म्हणजे काय असते ते आपल्या पाच वर्षाच्या कार्यकाळातून दाखवून दिले आहे. आता चिखलीकरांच्या आशीर्वादाने यावेळेस रेकॉर्डब्रेक मतांनी विजयी होऊ असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. चिखली विधानसभा मतदारसंघाची भाजपा–महायुतीची उमेदवार श्र्वेता महाले यांचा आज दि. २८ ऑक्टोबर रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय आयुष राज्यमंत्री मंत्री प्रतापराव जाधव, महायुतीचे पदाधिकारी आणि विशाल जनसमुदायाच्या साक्षीने उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी राजा टॉवर परिसरात झालेल्या जाहीर सभेत देवेंद्र फडणवीस सभेला संबोधीत करताना बोलत होते.







### रॅलीदरम्यान केले महापुरुषांना अभिवादन

खामगाव चौफुलीपासून रॅलीची सुरुवात झाली. प्रारंभीच तेथे असलेल्या स्वागत कमानीवर बसवण्यात आलेल्या ग्रामदेवता श्री रेणुकामातेच्या मूर्तीच्या प्रतिकृतीची महाआरती केल्यानंतर ही रॅली पुढे सरकली. बस स्थानकासमोरील डीपी रोडवर असलेल्या हिंदूसूर्य महाराणा प्रताप यांच्या भव्य पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल्यानंतर पुढे छत्रपती शिवाजी महाराज चौकात महाराजांच्या पुतळ्याला वंदन केले. जयस्तंभ चौकात असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्याला हार अर्पण केल्यानंतर महात्मा बसवेश्र्वर चौकामध्ये असलेल्या स्तंभाला अभिवादन केले. पुढे आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या पुतळ्याला हार अर्पण केल्यानंतर तहसील कार्यालयासमोर असलेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला अभिवादन करत सर्वांच्या उपस्थितीत तहसील कार्यालयामध्ये जाऊन उमेदवारी अर्ज दाखल केला.

### टाळ-मृदंगाचा गजर, बंजारा नृत्य आणि पुष्पवृष्टी

या रॅलीला एक सांस्कृतिक किनार आयोजकांनी यावेळी दिली. तेल्हारा परिसरातील भजनी दिंड्या मधील वारकरी देखील टाळ–मृदंगाच्या गजरासह हरिनामाचा जयघोष करत रॅलीमध्ये सहभागी झाले होते.याशिवाय बंजारा समाजातील भगिनींनी सामूहिक पारंपारिक नृत्य करत या रॅलीमध्ये सहभाग घेतला. त्यामुळे या रॅलीचे वेगळेपण उठून दिसले. अनेक ठिकाणी या रॅलीवर पुष्पवृष्टी करून माझे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

यावेळी फडणवीस पुढे म्हणाले की, चिखली येथील श्र्वेता महाले यांचा कारकीर्दीचा सुरुवातीच्या अडीच वर्षात केवळ अन्याय झाला. त्यानंतर आलेल्या महायुती सरकारने आपला खजिना चिखली मतदारसंघासाठी खुला केला आणि विकासाची दृष्टी असलेल्या आमदार श्वेता महाले यांनी विकासाचे नवे पर्व येथे सुरू केले. अशा जनतेशी बांधिलकी असलेल्या कर्तव्यदक्ष आमदार श्वेताताई महाले ह्या तुमच्या सर्वांच्या मतदानरुपी आशीर्वादाने रेकॉर्ड ब्रेक मतांनी विजयी होणार असा दृढ विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. तत्पूर्वी दुपारी १२ वाजता खामगाव चौफुली येथील जिल्हा सहकारी बँकेच्या चौकातून भव्य रॅलीला सुरुवात झाली. ही रॅली बस स्थानक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, जयस्तंभ चौक या मार्गाने राजा टॉवर येथे पोहोचली. तेथे रॅलीचे सभेमध्ये रूपांतर झाले.

यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी श्वेता महाले यांनी आमदारकीच्या कार्यकाळात केलेल्या कार्याचे भरभरून कौतुक केले. विधिमंडळाचा उत्कृष्ट भाषण पुरस्कार प्राप्त करून आपल्या संसदीय कार्याची चुणूक दाखवून दिली असल्याचे म्हणत अशा कर्तव्यदक्ष आमदार असलेल्या श्र्वेता महाले यांना पुन्हा एकदा विधानसभेत चिखली मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी द्या, असे आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. याप्रसंगी भाजपाचे जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश मांटे, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य प्रकाश महाराज जवंजाळ, पिपल्स रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष विजय गवई, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष शंतनू बोंद्रे, शिवसेना शहर प्रमुख विलास घोलप, भाजपा अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हाध्यक्ष शेख अनीस, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष डॉ. तेजराव नरवाडे यांची देखील भाषणे झाली. या सर्व वक्त्यांनी आपण चिखली मतदारसंघात केलेल्या विविधांगी विकासकार्याचा उल्लेख करत मलाच पुन्हा संधी देण्याचे आवाहन केले.

## विविध वृत्त...

### धुळे शहरातून वंचित ने जोरदार शक्तिप्रदर्शन करत दाखल केला उमेदवारी अर्ज



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे शहर विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात महायुती व महाविकास आघाडीकडून दंड थोपाटले जात असताना वंचित बहुजन आघाडीही पुर्ण ताकदनिशी मैदानात उतरली आहे. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार जितेंद्र शिरसाठ यांनी आज जोरदार शक्तीप्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. निळ्या झेंड्यांसह काढण्यात आलेल्या शक्तीप्रदर्शन रॅलीत हजारो पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच महिला व पुरुष सहभागी झाले होते.

मी वंचित बहुजन आघाडीतर्फे उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. कोणावर आरोप किंवा टीका करण्यासाठी आपण उमेदवारी करत नसून आतापर्यंतच्या आमदार, खासदारांनी धुळेकरांची निराशा केली आहे. केवळ आश्र्वासन देण्याचे काम त्यांनी केले. मात्र, मी जनतेला कळकळीचे आवाहन करतो की एकवेळा वंचित बहुजन आघाडीला संधी देवून बघा. आमच्या कामातून आम्ही तुमचा विश्र्वास सार्थ ठरवू. असा विश्र्वास माजी नगरसेवक तथा वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार जितेंद्र शिरसाठ यांनी यावेळी व्यक्त केला.

### मेहकर विधानसभेसाठी १० उमेदवारांचे १६ नामनिर्देशपत्र दाखल

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर विधानसभा निवडणुकीसाठी उमदेवारी अर्ज दाखल करण्यास केवळ एक दिवसाचा कालावधी शिल्लक असून सोमवारी दि.२८ ऑक्टोबर रोजी १० उमेदवारांनी १६ नामनिर्देशपत्र दाखल केले आहेत. आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी कार्यक्रम जाहीर झाला असून उमदेवारी अर्ज दाखल करण्यास दि. २२ ऑक्टोबरपासून प्रारंभ करण्यात आला आहे. तर मंगळवार



दि.२९ ऑक्टोबर हा शेवटचा दिवस आहे. तर विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छूक असलेल्यांनी उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल करण्यास प्रारंभ केला आहे. मेहकर विधानसभा मतदार संघासाठी दि.२८ ऑक्टोबर रोजी ६ उमेदवारांनी ८ नामनिर्देशनपत्र दाखल केले आहेत. तर दि.२८ ऑक्टोपर्यंत १० उमेदवारांनी १६ नामनिर्देशपत्र दाखल केले आहेत. तर दि.२८ ऑक्टोबर २०२४ दाखल केलेल्या उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील, राज्य स्तरावरील मान्यता प्राप्त पक्षाच्या, सध्या विसस, विपस असलेल्या उमेदवारांची नावे निरंक आहेत.आतापर्यंत दाखल केलेल्या उमदेवारी अर्जामध्ये ऋतुजा ऋषांक चव्हाण व सिद्धार्थ रामभाऊ खरात यांनी दोन दोन उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.तसेच नरहरी ओंकार गवई, संजय समाधान कळसकर, भास्कर गोविंदा इंगळे, डॉ. जानू जगदेव मानकर या १० उमेदवारांनी १६ नामनिर्देशपत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल केले आहेत.

## दूध व दुग्धजन्य पदार्थ भेसळ नियंत्रण समिती गठीत

### भेसळ करणाऱ्या विक्रेंतावर होणार कारवाई, तक्रारी नोंदविण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सणासुदीच्या दिवसात अनेक ठिकाणी, मिठाई व गोड धोड पदार्थ बनविण्यासाठी दूध व दुग्धजन्य पदार्थाचा वापर केला जातो. खवा, बर्फी, मावा, पेढा मिठाई बनविण्यासाठी लागणारे दूध व खवा सारख्या पदार्थामध्ये भेसळ होण्याचे नाकारता येत नाही. त्यामुळे अशी भेसळ रोखण्यासाठी शासनाने दूध व दुग्ध जन्य पदार्थ भेसळ नियंत्रण समिती गठीत केली असून भेसळ करणाऱ्या विक्रेतांवर कडक कारवाई केली जाणार आहे. कोणीही स्थानिक दुकानदार किंवा विक्रेता भेसळ करीत असल्यास समितीच्या निदर्शनास आणून द्यावे, असे आवाहन समितीव्दारे करण्यात आले आहे.

अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचा अध्यक्षतेखाली दूध व दुग्ध जन्य पदार्थ भेसळ नियंत्रण समिती गठीत केली आहे. त्यामध्ये अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक, पशुसंवर्धन उपायुक्त, वजन माप नियंत्रक अधिकारी सदस्य असून जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी सदस्य सचिव आहेत. जिल्ह्यातील मलकापूर, नांदुरा आणि सिंदखेडराजा, देऊळगाव राजा परिसरात बऱ्याच ठिकाणी दुग्धजन्य पदार्थ तयार करणारे स्थानिक व्यवसायिक आहेत. तसेच जिल्हा बाहेरून सुद्धा सण उत्सवानिमित्त खूप मोठ्या प्रमाणात मिठाई बाजारात विकायला येतात. त्यामुळे सतर्कता बाळगून नागरिकांना स्वच्छ व शुद्ध मिठाई किफायत दरात उपलब्ध व्हावी म्हणून सदर समिती कार्यरत असते. दि. २५ ऑक्टोंबर २०२४ रोजी अन्न सुरक्षा अधिकारी जी. के. वसावे आणि जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी डॉ. डी. एन.काळे यांनी नांदुरा तालुक्यातील काही गावांमध्ये तसेच नांदुरा रेल्वे स्थानक परिसरात भेट देऊन दुग्धजन्य पदार्थ विक्रेत्याकडून दुग्धजन्य पदार्थांचे नमुने तपासणी करिता घेऊन पुढील कारवाई करण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे दिली आहे.

## उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाईत ५४ लाख किमतीचा मुद्देमाल जप्त

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या विविध पथकांनी ठाणे जिल्ह्यामध्ये मुंब्रा वळण रस्ता, येथे भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याची वाहतूक करीत असलेल्या वाहनावर आणि सहकार नगर, लिंक रोड, चेंबूर, मुंबई या ठिकाणी परराज्यात निर्मित असलेला भांग मिश्रीत पदार्थांची वाहतूक करणाऱ्या वाहनावर २६ ऑक्टोंबर रोजी कारवाई केली.यामध्ये चेंबूर येथील कारवाईत ५ व मुंब्रा येथील कारवाईमध्ये २ अशा एकूण ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या दोन्ही कारवाईमध्ये एकूण ५४ लाख ४८ हजार ६०० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या मुद्देमालापैकी चेंबूर येथे ३५ लाख ७३ हजार ४०० व मुंब्रा येथे १८ लाख ७५ हजार २०० रूपयांचा समावेश आहे.या गुन्ह्यातील आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



या कारवाईमध्ये जप्त केलेल्या साहित्यामध्ये ३ टेम्पो वाहने, २२३२ किलो भांग मिश्रीत पदार्थ, परराज्यातील भारतीय बनावटीचे १२० बॉक्स विदेशी मद्य आदींचा समावेश आहे.राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक प्रसाद सुर्वे, कोकण विभागीय उपआयुक्त प्रदीप पवार यांनी दिलेल्या निर्दे शांच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली. मुंब्रा येथील कारवाई ठाणे अधिक्षक प्रवीण तांबे, उपअधीक्षक श्री. वैद्य, श्री. पोकळे, ए. डी देशमुख, यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. चेंबूर येथील गुन्ह्यामध्ये दुय्यम निरीक्षक विशाल सकपाळ, रिंकेश दांगट, हनुमंत यादव, सहा. दुय्यम निरीक्षक महावीर कोळेकर, जवान केतन वझे, भाऊसाहेब कराड, हनुमंत गाढवे, विजय पाटील, नारायण जानकर, श्रीराम राठोड, अमित सानप, कुणाल तडवी यांनी कारवाई केली. तसेच मुंब्रा येथील कारवाईमध्ये निरीक्षक एम.पी धनशेट्टी, दुय्यम निरीक्षक एन. आर. महाले, दुय्यम निरीक्षक एस. आर मिसाळ,सहायक दुय्यम निरीक्षक बी. जी थोरात, जवान श्री. खेमनर, आर. एस पाटील, पी. ए महाजन, पी. एस नागरे, एम. जी शेख, श्रीमती एस.एस. यादव यांनी सहभाग घेतला, असे कोकण उपआयुक्त प्रदीप पवार यांनी कळविले आहे.

### सार्वत्रिक विधानसभा निवडणूक-२०२४: सात मतदारसंघात ८० व्यक्तींनी १२९ नामनिर्देशन अर्जाची केली उचल

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सार्वत्रिक विधानसभा निवडणूक–२०२४ अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील सात मतदारसंघात सोमवार दि. २८ ऑक्टोंबर २०२४ रोजी ८० व्यक्तींनी १२९ नामनिर्देशन अर्जाचे उचल केले. मतदारसंघनिहाय अर्जाची माहिती याप्रमाणे : २१–मलकापूर विधानसभा मतदारसंघात ८ व्यक्तीनी ११ अर्ज, २२–बुलढाणा विधानसभा मतदारसंघात ९ व्यक्तीनी २० अर्ज, २३–चिखली विधानसभा मतदारसंघात १४ व्यक्तीनी २० अर्ज, २४–सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात १४ व्यक्तीनी २४ अर्ज, २५–मेहकर विधानसभा मतदारसंघात १९ व्यक्तीनी २८ अर्ज, २६–खामगांव विधानसभा मतदारसंघात १० व्यक्तीनी १८ अर्ज व २७–जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघात ६ व्यक्तीनी ८ अर्ज असे एकूण ८० व्यक्तींनी १२९ अर्ज उचल केले आहे. जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघासाठी मंगळवार दि. २९ आक्टोंबर हा नामनिर्देशन पत्र सादर करण्याचा शेवटचा दिनांक असणार आहे. बुधवार दि. ३० ऑक्टोबर रोजी नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात येणार आहे. सोमवार दि. ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. बुधवार दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान तर शनिवार दि. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक प्रक्रिया २५ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

### मतदानासाठी विद्यार्थ्यांनी पालकांना घातले साकडे

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी स्वीप कक्षाच्यावतीने मतदान जनजागृतीचे विविध उपक्रम घेतले जात आहेत. नांदेड–वाघाळा महानगरपालिका वजीराबाद येथील शाळा क्रमांक १ मध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसाठी मतदान संकल्पपत्र लिहिले आहे.

## उमेदवार, नागरिक व राजकीय पक्षांना निवडणूक निरीक्षकांकडे तक्रार करता येणार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक –२०२४ करिता बुलढाणा जिल्ह्यातील सातही विधानसभा मतदारसंघांसाठी भारत निवडणूक आयोगाने सामान्य, खर्च आणि पोलीस विषयक बाबींसाठी निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. हे निवडणूक निरीक्षक जिल्ह्यातील मतदारसंघात दाखल झाले असून उमेदवार, नागरिक व राजकीय पक्षांना निवडणूक संदर्भातील समस्या व तक्रारी असल्यास निवडणूक निरीक्षकांची भेट घेता येणार आहे किंवा संपर्क करता येणार आहे.

जिल्ह्यातील सिंदखेड राजा, मलकापूर, बुलढाणा, खामगांव, चिखली, मेहकर, जळगाव जामोद या सातही मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षक नेमण्यात आले आहेत. मतदारसंघनिहाय निवडणूक निरीक्षक उपलब्ध असणार आहेत. यामध्ये भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी स्मिता सबरवाल, सिमा सरकार, नरेश झा हे निवडणूक निरीक्षक सामान्य तर निवडणूक खर्च निरीक्षक दानिष अब्दुल्ला, नवनीत कुमार आणि निवडणूक निरीक्षक पोलीस गुरमितसिंग चौहान यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

**निवडणूक निरीक्षक (सामान्य)**

बुलढाणा व मलकापूर मतदार संघासाठी सामान्य निवडणूक निरीक्षक स्मिता सबरवाल यांना बुलढाणा येथील शासकीय विश्राम गृह येथे सकाळी १०.३० ते ११.३० या वेळेत भेटता येणार असून त्यांना ८०८०४१७१९० या भ्रमणध्वनीवर सुध्दा संपर्क करता येणार आहे. मेहकर, खामगाव, जळगाव जामोद या मतदार संघासाठी सामान्य निवडणूक निरीक्षक सीमा सरकार यांना खामगाव येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे विश्राम गृह (ब्रिटीश कालीन), खामगाव येथे सकाळी ९.०० ते १०.०० आणि सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळेत भेटता येणार असून ८४८३०७७८२५ या भ्रमणध्वनी वर सुध्दा संपर्क करता येणार आहे. चिखली आणि सिंदखेड राजा या मतदार संघासाठी सामान्य निवडणूक निरीक्षक नरेश झा यांना बुलढाणा येथील शासकीय विश्राम गृह येथे सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत भेटता येणार असून त्यांना ९२२६१५२९५५ या भ्रमणध्वनीवर सुध्दा संपर्क करता येणार आहे.

**निवडणूक निरीक्षक (खर्च)**

निवडणूक खर्च विषयक बाबीं संदर्भात तक्रार असल्यास निवडणूक खर्च निरीक्षक यांना भेटता येणार आहे. बुलढाणा,चिखली, मलकापूर आणि सिंदखेड राजा मतदार संघासाठी खर्च निवडणूक निरीक्षक दानिश अब्दुल्ला यांना बुलढाणा येथील शासकीय विश्राम गृहातील सावित्री कक्षामध्ये सकाळी ९.०० ते ११.०० या वेळेत भेटता येणार असून त्यांना ७२७६१९१७६८ या भ्रमणध्वनीवर सुध्दा संपर्क करता येणार आहे. मेहकर, खामगाव, जळगाव जामोद या मतदार संघासाठी निवडणूक खर्च निरीक्षक नवनीत कुमार यांना खामगाव येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे विश्राम गृह (रेल्वे गेट), खामगाव येथे सकाळी ९.३० ते १०.३० या वेळेत भेटता येणार असून ८८२६६०४०६२ या भ्रमणध्वनी वर सुध्दा संपर्क करता येणार आहे. निवडणूक निरीक्षक पोलिस गुरमितसिंग चौहान यांना पोलिस विषयक समस्या व तक्रारींसाठी बुलढाणा येथील विश्राम गृह येथे भेटता येणार आहे.